| | |
|---|---|
| MHSN060025302023 | R.C.S.302/2023<br>Mumtaj Ajij Inamdar Vs. Aapaso Babu Kalawant |

## नि. ३० वरील आदेश

०१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे मिळकतीची प्रत्यक्षपणे मोजणी करुन वाटप सुचविणेकरीता वादी व प्रतिवादी यांचे एकमताने एका तज्ञ इंजिनियरची नेमणूक करणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द वाटप व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रकरणात प्रतिवादीनी संगनमत करुन वादीचा हक्क, हिस्सा डावलणेच्या हेतुने वादी नं. १ यांना दि. १२.०८.२०२३ रोजी जबर मारहाण करुन त्यांना गंभीर जखमी केले आहे. प्रतिवादी यांच्या आशा वागण्याने वादींचे न्याय मिळकतीचे हक्कास धोका निर्माण झाला असून दावा मिळकतीमधील वादीचे शांततामय कब्जेवहीवाटीसही धोका निर्माण झालेला आहे. त्याकरीता वादीने कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये याकरीता तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींना व्हावी याकरीता अर्ज दाखल केला आहे. दरम्यान सदर अर्जावर युक्तीवाद झालेनंतर वादी व प्रतिवादी यांचेमध्ये मध्यस्थामार्फत चर्चा होऊन सदर कामी नमूद तज्ञ इंजिनियर यांचेमार्फत मोजणी होऊन मिळकतीचा नकाशा तयार करुन त्याप्रमाणे एकमेकांचे ताबेप्रमाणे मिळकतीचे वाटप सुचविणेचे ठरलेले आहे. त्यानुसार एकमेकांचे समत्तीने दावा मिळकतीची मोजणी करुन वाटप सुचविणेकरीता वादी व प्रतिवादी यांचे एकमताने एका तज्ञ इंजिनियरची नेमणूक करणेत यावी याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. सदरकामी प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे पुढे कथन आहे की,वादी व प्रतिवादी यांचेमधील वाटपाचा वाद कायमस्वरुपी सुटणेचे

हेतुने सदर प्रकरण मेडिएशनकरीता पाठविणेत आले होते. त्यामध्ये ठरलेनुसार मा. सिटी सर्वे यांचेमार्फत वादीचा १/४, प्रतिवादी नं. १ व २ यांचा प्रत्येकी १/४ व प्रतिवादी नं. ३ व ४ यांचा प्रत्येकी १/८ याप्रमाणे वाटप सचविणेबाबत आदेश करणेस प्रतिवादीची हरकत नसल्याचे कथन केले आहे. सबब त्यांनी कोर्ट कमिशनर म्हणून सिटी सर्वे ऑफिसर यांची नेमणूक करणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

**०४.** अर्ज वाचला. दावा व कैफियत पाहीली. प्रस्तुतचा दावा वाटप व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादीने मागणी केल्याप्रमाणे वाद मिळकतीची प्रत्यक्ष मोजणी करुन त्याप्रमाणे वहिवाटीप्रमाणे नकाशा तयार करुन वाटप सुचविणेकरीता तज्ञ इंजिनियरची नेमणूक करणेत यावी अशी विनंती आहे. याऊलट प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये कोर्ट कमिशन म्हणून तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, मिरज यांची नेमणूक करणेबाबत कथन आहे.

**०५.** वर नमूद सर्व बाबींचे अवलोकन केले असता कोर्ट कमिशन केल्यास प्रस्तुतचा वाद कायमस्वरुपी मिटण्यास व सदरचा दावा गुणदोषावर चालविणेस मदत होणार आहे. वादी आणि प्रतिवादी यांच्या वादविषयाची सध्याची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक असलेने कोर्ट कमिशनर नेमून वाद मिळकतीची प्रत्यक्ष मोजणी होऊन सध्याची वस्तुस्थिती व हात नकाशा सादर झाल्यास वाद विषयाचा योग्य व परिणामकारक निर्णय होणेस मदत होणार आहे. त्यामुळे वाद मिळकतीचा वस्तुस्थिती अहवाल व हात नकाशा कमिशनद्वारे निरिक्षण होवून वस्तूनिष्ठ अहवाल करणेकामी तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, मिरज यांची कमिशनर म्हणून नेमणूक करणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

**०६.** सदर कामी कोर्ट कमिशनर नियुक्त करणे वादातील वाद विषय योग्यरित्या न्यायनिवाडा करणेसाठी उपयोगी ठरणार आहे. तसेच यामुळे पुरावाही निर्माण होत नाही.

त्यामुळे सदरचा अर्ज अंशतः मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादी यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. मोजणी अधिकारी, भूमी अभिलेख, मिरज (TILR, Miraj) यांची सदरकामी कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे आणि त्यांना असा निर्देश देणेत येत आहे की, त्यांनी वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे मिळकतीची मोजणी करुन त्याप्रमाणे मोजणीसह नकाशा तयार करावा व त्याबाबतचा अहवाल या न्यायालयात दोन महिन्यात सादर करावा.

३. कोर्ट कमिशनर यांनी सर्व पक्षकारांना पूर्व नोटीस देवून कमीशन करावे. सदर कामी सर्व पक्षकारांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी न्यायालयीन आयुक्तांना लागेल ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन योग्य ते सहकार्य करावे.

४. वादी व प्रतिवादी यांनी दोघांनी मिळून निम्मे–निम्मे नियमानुसार मापन शुल्क भुमी अभिलेख, मिरज (TILR, Miraj) येथे भरावे.

RANJANA VIJAY KAMBLE
Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2024.09.13 17:59:09 +0530

ठिकाण–मिरज
(श्रीमती रंजना विजय कांबळे)
दिनांक १३.०९.२०२४.
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. |
| Date of decision / typed | :- | 13 09 2024 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 13 09 2024 |
| Judgment/order uploaded on | :- | 13 09 2024 |